www.sgbauonline.com



**B.A. (Part—III) Examination**

**(Optional Subject)**

**MARATHI**

**(Literature)**

वेळ : तीन तास] [एकूण गुण : 100

1. खालील वाक्यांचे संदर्भासह स्पष्टीकरण करा :— 20

(अ) "हा तपोधन वृद्ध देहाने फ्लोरेन्समध्ये असला, तरी मनाने भारतात राहत होता.''

किंवा

"ह्या भ्रमिष्टांच्या समाजात घेरी आणणारी अस्थिरता हेच सत्य आहे.''

(ब) "हे पॅरिस आहे, नेपल्स आहे, क्योटो आहे आणि हाँगकाँगही आहे. पण हे सगळे असूनही हे सॅन् फ्रॅन्सिस्को आहे.''

किंवा

'लावण्यवतींनी तर जणू काय नौकांची शर्यत नसून सौंदर्यस्पर्धा असाव्यात, असा साजशृंगार केला होता. माणसांच्या जगात कुठे दु:ख असेल तरी का ? अशी शंका यावी, असे हे वातावरण.''

(क) "कोन रे तुम्ही बेलदार का, आरे गुडेकऱ्यांनू, हीच वली बाळातीन हाय का ? तिलाबी देवळात घिऊन आले. अरे



www.sgbauonline.com

www.sgbauonline.com

सर्व इटाळ केला करे हैवानानी. काईबी खाऊन यितात. देव धरम कळत न्हाय का. सगळा धर्म बाटविला.''

किंवा

"आरे मी देवीला मानतू. ह्या मुरूळी पोरीला करून देवीपसी कशाला सोडायचं ? गयाला मुरूळी करा, पर घरीच न्हाऊ द्या.''

(ड) "बस करा, लेक्रू हायं मरंल. हानू नगा हो ; मला हाना पर मह्या लेक्राला हानू नगाहो. पुस्तक चोरलं गुन्हा केला.''

किंवा

"ए पुतळी, तू मही मालक हाय का. म्या रोज दारू पिल. म्या कमवतू. म्याच गमविल. मला दारू सोड सांगनार तू कोन ?''

2. 'कॅप्री' बेटावरील निसर्ग सौंदर्याचे दर्शन 'निळाई' या लेखातून पु.ल. देशपांडे यांनी कसे साकार केले आहे ते सविस्तर लिहा. 20

किंवा

'जावे त्यांच्या देशा' या पु.ल. देशपांडे यांच्या प्रवासवर्णन पुस्तकाचे परीक्षण करा.

3. अशोक पवार यांच्या संघर्षमय जीवनाची कहाणी 'बिराड' या आत्मकथनाच्या आधारे सविस्तर लिहा. 20

किंवा

आत्मकथनाचे स्वरूप स्पष्ट करून 'बिराड' या आत्मकथनाची वैशिष्ट्ये लिहा.



4. भाषेचे स्वरूप सांगून तिचे विविध उपयोग स्पष्ट करा. 20

किंवा

रूपिका, रूपिम, रूपिकान्तर या संकल्पना उदाहरणांसह स्पष्ट करा.

5. प्रमाणभाषा आणि बोली यांच्या व्याख्या सांगून परस्परसंबंध स्पष्ट करा. 20

किंवा

टिपा लिहा (कोणत्याही दोनवर) :—

(1) स्वनांचे गुणधर्म

(2) केवल वाक्याचे वर्गीकरण

(3) मराठीची स्वनिम व्यवस्था

(4) वाक्यांची उच्चारणे व त्यांचे लेखन यातील अंतर.



www.sgbauonline.com